१८

# "मुरबाड तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेचा अभ्यास."

**सौ. मनिषा दयाघन पाटील**
पीएच. डी. संशोधिका,
सेवासदनचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, उल्हासनगर

**डॉ. संजय निंबाळकर**
सहा. अध्यापक,
सेवासदनचे शिक्षणशात्र महाविद्यालय, उल्हासनगर

**सारांश:**

प्राथमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे. प्राथमिक शिक्षणामधून विदयार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा बौद्धिक, शारीरिक भावनिक अशा स्तरावरील क्षमता आणि कौशल्याचा विकास अपेक्षित असतो. विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक सतत कार्यमग्न असतो. शिक्षण क्षेत्रात होत असलेले बदल, शासनाची नवनवी धोरणे व कायदे याबाबत शिक्षक जागरूक असतील तरच ते हे सर्व स्वीकारतील व विदयार्थ्यांसाठी त्याचा योग्य वापर करतील. याचसाठी या संशोधनातून प्राथमिक शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेचा अभ्यास संशोधिकेने केला आहे. मुरबाड तालुक्यातील १०० प्राथमिक शिक्षकांची निवड यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली. माहिती संकलनासाठी 'टी' परिक्षिका, मध्यमान, प्रमाण विचलन ही संख्याशास्त्रीय तंत्रे वापरली आहेत. संशोधनाअंती असे आढळले की, बहुतांशी शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत जागरूकता आहे. असे ही दिसून आले की, शिक्षकांची शैक्षणिक अर्हता व अनुभव यामुळे शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेवर फरक पडत नाही, परंतु लिंग हा घटक शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेबाबत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.

**बीजसंज्ञा:**

प्राथमिक शिक्षक, शिक्षण हक्क अधिनियम २००९, जागरूकता.

**प्रस्तावना:**

प्राथमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण आहे. प्राथमिक शिक्षणामधून विदयार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा बौद्धिक, शारीरिक, भावनिक अशा स्तरावरील क्षमता आणि कौशल्याचा विकास अपेक्षित असतो. त्यानुसार प्राथमिक शिक्षणाची सर्वसाधारण उद्दिष्टे निश्चित केली जातात. विदयार्थ्यांच्या सुप्त शक्ती, क्षमता आणि विविध कौशल्याचा विकासही अध्ययन अध्यापन, विविध अनुभव यांमधून विकसित होत असतो. प्राथमिक स्तरावरील शालेय शिक्षण हळूहळू नवीन विचारांनी आणि नवीन पद्धतीनी विकसित होऊ पाहत आहे. पायाभूत सुविधा पुरविण्यासंदर्भात बदल होताना दिसत आहेत. प्राथमिक शिक्षण हाच खरा शिक्षणाचा पाया आहे, पाया मजबूत असेल तरच इमारत मजबूत बनते.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठीच भारत सरकारने शिक्षण हक्क अधिनियम २००९ हा अधिनियम लागू केला. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा विषयी आपण एप्रिल २००९ पूर्वीपासूनच ऐकतो आहोत. परंतु याची पार्श्वभूमी १०० वर्षापूर्वीची आहे. नामदार गोखले यांनी पहिल्यांदा ब्रिटीश राजवटीत १८ मार्च १९१० रोजी तत्कालीन ब्रिटीश पालमेंटसमोर मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या मागणी करणारा प्रस्ताव सादर केला होता. शिक्षण हक्क अधिनियम २००९ मध्ये असलेल्या तरतुदींमुळे सर्व बालक शिक्षण प्रवाहात तेव्हाच सामील होऊ शकतील जेव्हा या कायदयाची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल.

**संशोधनाची गरज व महत्त्वः**

मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम हा ऑगस्ट २००९ मध्ये संसदेने पारीत केला. त्यानंतर त्कालीन राष्ट्रपतींच्या मान्यतेनंतर हा अधिनियम १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण देशभर जम्मू व काश्मीर वगळता लागू होत असल्याची अधिसूचना जारी करण्यात आली. त्याच दिवशी भारतीय राज्यघटनेच्या ८६ व्या घटनादुरूस्तीनुसार ६ ते १४ वयोगटातील बालकांना मोफत आणि आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क प्राप्त झाल्याचे अधिसूचित करण्यात आले आणि भारताने प्रगत व विकसनशील देशांच्या यादीत एक पाऊल पुढे टाकले. भविष्यात याचा परिणाम आपल्याला नक्कीच पहावयास मिळेल. यासाठी शिक्षण हक्क अधिनियम २००९ ची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

कायदा असला तरी सर्व बालकांना शिक्षण प्रवाहात सामील करून घेणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे यासाठी प्रामुख्याने शिक्षकांवर जबाबदारी अधिक असते कारण त्यांचा विदयार्थ्यांशी सतत व प्रत्यक्षात संपर्क असतो. त्यामुळेच शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत जागरूकता असेल तरच या कायदयाची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकेल. संशोधिका चौदा वर्षापासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून विदयार्थ्यांविषयी असलोली तळमळ यामुळेच संशोधिकेला संशोधनासाठी याविषयाची निवड करण्याची गरज वाटली.

**उद्दिष्टे ः**

१. शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत प्राथमिक शिक्षकांमध्ये असलेल्या जागरूकतेचा अभ्यास करणे.

२. पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्यामधील असलेल्या जागरूकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत डी. एड. शिक्षक व बी. एड. शिक्षक यांच्यामध्ये असलेल्या जागरूकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना ः**

१. पुरुष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्यामधील शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही.

२. डी. एड. शिक्षक व बी. एड. शिक्षक यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही.



Vol: 7th, Issue : III , English-Marathi, Quarterly: 1st Dec 2018,ISSN : 2319-5525

UGC Approval No. 63299

३. डी. एड. पुरूष शिक्षक व डी. एड. स्त्री शिक्षिका यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही.

४. बी. एड. पुरूष शिक्षक व बी. एड. स्त्री शिक्षिका यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ः**

प्रस्तुत संशोधनासाठी फक्त मुरबाड तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांची निवड शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेचा अभ्यास करण्यासाठी केली आहे.

**संबंधित साहित्याचा आढावाः**

संबंधित संशोधन साहित्याचा आढावा संशोधकाला आपल्या संशोधन कार्याच्या सर्व स्तरावर मागदर्शक म्हणून उपयोगी ठरतो. समस्येची निवड, शब्दांकन, गृहीतकांची निर्मिती, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ठरविते. संशोधनाचा आराखडा ठरविणे, नमुना निवड, माहिती संकलन, वर्गीकरण, विश्लेषण, संख्याशास्त्रीय पद्धतीचे विशदीकरण व अर्थनिर्वचन करणे सोपे जाते. या सर्व बाबतीत संबंधित संशोधन साहित्याचे सर्वेक्षण उपयुक्त ठरते.

संबंधित संशोधन साहित्याचा आढावा घेतला असता संशोधिकेला प्रस्तुत संशोधनासाठी निगडीत असलेली काही संदर्भ संशोधने व संशोधन पेपर पुढीलप्रमाणे आढळले.

**अशोक आणि कामत २०११ ः**

यांनी आर. टी. ई. कायदा २००९ चा अभ्यास केला. गुणवत्ता पूर्ण शिक्षण हे बालकांच्या तसेच देशाच्या विकासासाठी आवश्यक आहे. या अभ्यासात असे आढळून आले की प्राथमिक शिक्षकांमध्ये कायदयातील तरतुदीबाबत जागरूकता आहे.

**श्रीमती. सिंह भारती अजीतकुमार २०१५ ः**

डॉ. संजय निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली " बी.एड. छात्र अध्यापको के शिक्षा का अधिकार संबंधी जागरूकता का अभ्यास." या विषयावर मुंबई विद्यापीठास एम.एड. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध.

सदर संशोधनात ठाणे जिल्हयातील मुंबई विद्यापीठांतर्गत येणा या पाच बी.एड. महाविद्यालयातील छात्र शिक्षकांचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक महाविद्यालयातील वीस छात्र शिक्षकांची निवड यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने केली. सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून प्रश्नावली या तंत्राने माहितीचे संकलन करण्यात आले आहे. बंदिस्त प्रश्नावलीत एकूण २६ प्रश्नांचा समावेश आहे.



Vol: 7th, Issue : III , English-Marathi, Quarterly: 1st Dec 2018,ISSN : 2319-5525
UGC Approval No. 63299

सदर संशोधनातील अभ्यासात असे आढळून आले की, मराठी माध्यमातील, हिंदी माध्यमातील व इंग्रजी माध्यमातील छात्र शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत सार्थक अंतर नाही. मराठी माध्यमातील, हिंदी माध्यमातील व इंग्रजी माध्यमातील छात्र शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत जवळपास समान जागरूकता आहे. तसेच पदवी धारक व पदवीत्तोर पदवी धारक छात्र शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत सार्थक अंतर नाही. पदवी धारक व पदवीत्तोर पदवी धारक छात्र शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत जवळपास समान जागरूकता आहे. कला पदवी धारक व विज्ञान पदवी धारक छात्र शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत सार्थक अंतर नाही. कला पदवी धारक व विज्ञान पदवी धारक छात्र शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत जवळपास समान जागरूकता आहे. यावरून संशोधिका या निष्कर्षाप्रत आली की, एकूण सर्व बी.एड. छात्र शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेली जागरूकता सकारात्मक आहे.

**सरोज व्यास २०११ :**

यांनी "मुलांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियम २००९ यावर आधारित राजधानी क्षेत्रातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांमध्ये असलेल्या जागरूकतेचा अभ्यास" केला.

प्रस्तुत संशोधनात दिल्ली येथील शिक्षकांमध्ये असलेली जागरूकतेची पातळी या कायदयाच्या अंमलबजावणीला एक वर्ष झाल्यानंतर देखील आवश्यक त्या पातळीपर्यंत पोहचली नाही. सरकारी शाळांतील शिक्षकांमध्ये तुलनात्मकदृष्टया अधिक जागरूकता दिसून आली.

**संशोधन पद्धती :**

संशोधन समस्येच्या स्वरूपावरून संशोधनासाठी वापरली जाणारी पद्धती निश्चित केली जाते. सदर संशोधन वर्त मानकाळाशी संबंधित असल्यामुळे वर्णनात्मक पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे.

**संशोधन साधन :**

प्रस्तुत संशोधनासाठी स्वरचित प्रश्नावली हे साधन वापरण्यात आले आहे.

**न्यादर्श :**

प्रस्तुत संशोधनासाठी मुरबाड तालुक्यातील १०० प्राथमिक शिक्षकांचा न्यादर्श घेण्यात आला आहे. त्यांची निवड यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली आहे.

**सांख्यिकी तंत्रे :**

संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी 'टी' परिक्षिका, मध्यमान, प्रमाणविचलन ही संख्याशास्त्रीय तंत्रे वापरण्यात आली आहेत.

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलानासाठी प्रश्नावली हे साधन वापरण्यात आले. 'टी' परिक्षिका वापरून माहितीचे विश्लेषण करून आलेले निष्कर्ष कोष्टक स्वरूपात मांडले.

**परिकल्पना १**

पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्यामधील शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही .

टेबल १ वरून ० . ०५ च्या सार्थकता स्तरावर 'टी' ची किंमत १ . ९७ आली त्यामुळे हया परिकल्पनेचा ० . ०५ च्या स्तरावर त्याग करावा लागत आहे . यावरून असा निष्कर्ष निघतो की पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्यामधील शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळतो . म्हणूनच पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्यामधील शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत त्यांच्यातील लिंग या घटकामुळे लक्षणीय फरक आहे .

**परिकल्पना २**

डी . एड् . शिक्षक व बी . एड् . शिक्षक यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही .

टेबल २ वरून ० . ०५ च्या सार्थकता स्तरावर 'टी' ची किंमत ० . ७६असून असे निदर्शनास येते की ० . ०५ च्या स्तरावर 'टी' ची किंमत कमी आहे . परिकल्पनेचा ० . ०५ च्या स्तरावर स्वीकार करावा लागत आहे . यामुळे संख्याशास्त्रीय माहितीवरून असा निष्कर्ष येतो की डी . एड् . शिक्षक व बी . एड् . शिक्षक यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही .

**परिकल्पना ३**

डी . एड् . पुरूष शिक्षक व डी . एड् . स्त्री शिक्षिका यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही .

निरीक्षणाअंती असे आढळून आले की ० . ०५ च्या स्तरावर 'टी' ची किंमत कमी आहे . परिकल्पनेचा ० . ०५ च्या स्तरावर स्वीकार करावा लागत आहे . यामुळे असा निष्कर्ष येतो की डी . एड् . पुरूष शिक्षक व डी . एड् . स्त्री शिक्षिका यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही .

**परिकल्पना ४**

बी . एड् . पुरूष शिक्षक व बी . एड् . स्त्री शिक्षिका यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही .

० . ०५ च्या सार्थकता स्तरावर 'टी' ची किंमत १ . ३६असून असे निदर्शनास येते की ० . ०५ च्या स्तरावर 'टी' ची किंमत कमी आहे . परिकल्पनेचा ० . ०५ च्या स्तरावर स्वीकार करावा लागत आहे . यामुळे संख्याशास्त्रीय माहितीवरून असा निष्कर्ष येतो की बी . एड् . पुरूष शिक्षक व बी . एड् . स्त्री शिक्षिका यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही . म्हणूनच बी . एड् . शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत त्यांच्यातील लिंग या घटकामुळे लक्षणीय आढळून येत नाही .

**निष्कर्ष व शिफारशी :**

यावरून असे निदर्शनास येते की, बहुतांशी शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकता आहे.

पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षिका यांच्यामधील शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळतो. पुरूष शिक्षकांचे मध्यमान ३५.८५ असून स्त्री शिक्षिकांचे मध्यमान ३६.३१ एवढे आहे. हया वरून असे दिसून येते की, स्त्री शिक्षिकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत अधिक जागरूकता आहे.

डी. एड्. शिक्षक व बी. एड्. शिक्षक यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून येत नाही. डी. एड्. शिक्षक व बी. एड्. शिक्षक यांचे मध्यमान अनुकमे ३६.२३ व ३६.०३ आले, यावरून असे निदर्शनास येते की, डी. एड्. शिक्षक व बी. एड्. शिक्षक यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून येत नाही.

डी. एड्. पुरूष शिक्षक व डी. एड्. स्त्री शिक्षिका यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही. डी. एड्. शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत त्यांच्यातील लिंग या घटकामुळे लक्षणीय फरक आढळून येत नाही.

बी. एड्. पुरूष शिक्षक व बी. एड्. स्त्री शिक्षिका यांच्यामध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत लक्षणीय फरक आढळून आला नाही. म्हणूनच बी. एड्. शिक्षकांमध्ये शिक्षण हक्क अधिनियम २००९ बाबत असलेल्या जागरूकतेत त्यांच्यातील लिंग या घटकामुळे लक्षणीय आढळून येत नाही.

**संदर्भ :**

१. भिंताडे वि.रा., २००९ 'शैक्षणिक संशोधन पद्धती', नित्यनूतन प्रकाशन पुणे ३०

२. मुळे रा.श.,उमाठे वि.तु., १९८७ 'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती, नागपूर

३. जरग नामदेव संपादक मार्गदर्शिका २०१२, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०

४. कायंदे पाटील गंगाधर वि., 'संशोधन पद्धती', चैतन्य पब्लिकेशन्स २००९ नाशिक १३

५. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९, तृतीय आवृत्ती, ऑक्टोंबर २०१२

६. अशोक आणि कामत २०११ आर. टी. ई. कायदा २००९ चा अभ्यास

७. श्रीमती. सिंह भारती अजीतकुमार २०१५ " बी.एड. छात्र अध्यापको के शिक्षा का अधिकार संबंधी जागरूकता का अभ्यास."

८. सरोज व्यास २०११ "मुलांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियम २००९ यावर आधारित राजधानी क्षेत्रातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांमध्ये असलेल्या जागरूकतेचा अभ्यास"

...